सखदे काजल दिलीप

बी. ए. भाग - तीन

इतिहास

# प्रारंभीचा भारत

1) ताम्रपाषाणयुग -

नवाश्मयुगाच्या शेवटी तांबे या धातूचा शोध लागला. दगडी हत्यारांबरोबरच तांब्याच्या हत्यारांचा वापर सुरु झाला. एका अर्थाने अश्मयुगाचा कालखंड समाप्त झाला. मानवाने आपल्या दैनंदिन जीवनात तांबे या धातूचा मोठ्याप्रमाणात वापर सुरु केला. त्यामुळे या कालखंडाला ताम्रपाषाणयुग असे संबोधले जाते. याचा सर्वसाधारण कालखंड इ.स. पूर्व. २६००ते इ.स. पूर्व 1500 असा आहे.

अरवली पर्वताच्या रांगात तांब्याच्या खाणी सापडल्यामुळे या भागातील माळवा विभागात नागदा, कायथा, नवदतोली, नर्मदा काठावर त्रिपुरा व बेटवा, एरन, बनास किंवा अहर इ. ठिकाणी या संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. याच दरम्यान महाराष्ट्रात जार्वे संस्कृती होऊन गेली. तिचे अवशेष जार्वे, प्रकाश बहल, नेवासा, दायमाबाद, चांडोली, सोनेगाव, इनामगाव इ. ठिकाणी सापडतात.

मानवास प्रथम नैसर्गिक तांबे सापडले. त्याचे दागदागिने तो करु लागला. पुढे तांब्यात कथिल मिसळून ब्राँझ या मिश्रधातूची कला त्याने आत्मसात केली. या धातुपासून कुऱ्हाडी, भाले, कट्यारी, चाकू, मासेमारीचे गळ, छिन्न्या, आरसे, सुया तयार करु लागला. खनिज मिश्र मातीतून तांबे तयार करणे. व त्यात कथिलाचे मिश्रण करुन ब्राँझ तयार करणे हे तंत्रज्ञान मानवाने आत्मसात केले.

शेतीचा शोध लागल्यामुळे मानवाला स्थैर्य प्राप्त झाले. गहू, ज्वारी, तांदूळ, उडीद, वाल

बाजरी इ. पिके तो घेऊ लागला. तो स्थिर शेतकरी बनला. तांब्याच्या, धातूंच्या वस्तू करणारा नवा तंत्रज्ञ आणि कारागिरांचा वर्ग उदयास आला. वस्तुविनिमय सुरु झाला. या गरजेतूनच शेतीसाठी नांगराचा व दळणवळणासाठी चाकाचा शोध लागला. मोठ्या प्रमाणात तो पशुपालन करु लागला. तो शाकाहारी व मांसाहारी होता. मानवी जीवन अधिक स्थिर होऊ लागले. या काळातील मानवाची घरे गोलाकार असून ती गवताने शाकारलेली असत. भिंतीला मातीचा गिलावा असे. धान्य साठविण्यासाठी मृद रांजण असत. वाडगी कटोरे यासारखी सुबक मृदभांडी तो तयार करु लागला. त्यावरील नक्षीकाम रेखीव आहे. मातीच्या भांड्यावर स्वस्तिक चिन्ह काढल्याचे आढळून आले आहे. या काळात मृतांचे अंत्यसंस्कार घरातच मृद मडक्यात घालून केले जात होते. अशा दफनप्रसंगी त्याच्या नित्याच्या वस्तू ठेवल्या जात. मातृकेची पुजा पद्धत असावी असे आढळले.

2) मध्ययुगीन हत्यारे -

मध्याश्मयुगात हत्यारे बनविण्यासाठी प्रामुख्याने चर्ट किंवा जास्पर हा टणक दगड वापरला जात होता. ती आकाराने रेखीव आणि प्रमाणबद्ध आहेत. ती पुर्वीपेक्षा लहान व धारदार आहेत. यात तासण्या, हातकुऱ्हाडी, पाती, बाणाग्रे, त्रिकोण इ. समावेश आहे. महाराष्ट्रातील नेवासे येथे या काळातील हत्यारे सापडली आहेत. भारतात गारेच्या दगडापासून बनविलेली लघुअश्मास्त्रे सापडली आहेत. गेंड्याच्या खांद्याच्या हाडाचा वापर ऐरणीसारखा केला जात होता. लहान हत्यारे लाकडी दांडा किंवा लांब हाडात खाच पाडून बसविली जात. ही पाती अर्धचंद्राकृती, त्रिकोणी, चतुष्कोनी अशा वेगवेगळ्या प्रकारची आहेत. हत्यारे बनविताना निघालेल्या छिलक्यांचा उपयोग बाणांची टोके म्हणून केला जातो. वातावरणातील बदलांमुळे पूर्वीचे अजस्र प्राणी नष्ट झाले. प्राण्यांचे आकारमान लहान झाले. मानवही शुद्धा करून राहू लागला. कालचक्रात लहान प्राण्यांची शिकार करण्यासाठी त्याला लहान हत्यारांची गरज भासू लागली. शिकार आणि मच्छीमार हेच उपजिविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे हत्यारेही पुर्वीपेक्षा वेगळी व लहान झाली. कालचक्रात ती गोल व पन्हाळीदार होती. छिलके लांब, अरुंद आणि नाजूक होते. ही हत्यारे तयार करण्यासाठी पाते तंत्र तोला तंत्र व दाब तंत्राचा वापर केला जात होता. निसर्गाच्या बदलाच्या मानवाच्या हत्यारे आणि जीवनोपयोगी वस्तू तयार करण्याच्या तंत्रात लक्षणीय प्रगती झाली. हत्यारे लहान आणि

भौमितिक प्रमाणबद्ध बनविली गेली. सूक्ष्मास्त्रे हेच मध्ययुगीन हत्यारांचे वैशिष्ट्य मानले जाते. भारतातील कर्नाटक, आंध्र प्रदेश, बिहार, ओरिसा, आसाम, गुजरात, काश्मीर अशा विभागांत नवाश्मयुगीन हत्यारे उपलब्ध होतात.

# मध्ययुगीन भारताचा इतिहास

1) झियाउद्दीन बरनीचा अल्लाउद्दीन खिलजीबाबतचा वृत्तांत - अ) बरनी व त्याचे लेखन -
झियाउद्दीन बरनीने अनेक सुलतानांची कारकीर्द पाहिलेली होती. मुहम्मद बिन तुघलकच्या कारकिर्दीत १७ ते १८ वर्षे नाजिम या पदावर होता. अनेक सुलतानांचा राज्यकारभार त्याने जवळून पाहिल्याने व आपल्या प्रशासकीय अनुभवाच्या जोरावर त्याने तारीख - ए - फिरोजशाही हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने 1266 ते 1357 असा ९० वर्षांचा इतिहास दिलेला आहे. यामध्ये अल्लाउद्दीन खिलजी-च्या कारकिर्दीचा आढावा घेतला आहे.
अल्लाउद्दीन खिलजी - कारकीर्द - वृत्तांत -
सत्ता स्थिर व भक्कम करण्यासाठी वटहुकूम व कडक उपाय -
अल्लाउद्दीन खिलजीने सत्ता मिळवण्यासाठी खून, रक्तपात, दहशत इ. मार्गांचा अवलंब करून तो इ.स. 1296 मध्ये दिल्लीचा सुलतान झाला. आपली सत्ता भक्कम करण्यासाठी त्याने अनेक वटहुकुम काढले. गुप्तहेर खाते कार्यक्षम केले. अधिकारी, अमीर, उमराव, जमीनदार यांच्यावर हेरांमार्फत पूर्ण नियंत्रण ठेवले व अनेक बंधने घातली. दहशत वाढविली. मादक द्रव्यांवर बंदी घातली. श्रीमंतांच्या जमिनी जप्त केल्या. त्यांच्याकडील संपत्ती काढून घेतली. त्यांच्यावरील करांचे प्रमाण वाढविले. हिंदू आपल्याविरुद्ध बंडाळी करणार नाहीत. यासाठी त्यांच्याविरुद्ध अनेक कडक

उपाययोजना केल्या. त्यांच्यावर जिझिया कर आकारला खोत, मुकादम यांचे अधिकार काढून घेतले. शेतकऱ्यांवर उत्पन्नाच्या निम्मा कर आकारला. चौधरी, खोत, मुकादम यांची परिस्थिती अत्यंत गरिबीची करून टाकल्याने त्यांच्या बायकांना गरिबीमुळे पोट भरण्याकरिता मुसलमानांच्या घरी मोलमजुरीची हलकीसलकी कामे करण्यासाठी जावे लागत असे. थोडक्यात, अल्लाउद्दीन महत्त्वाकांक्षी असल्याने त्याने सत्तेसाठी विविध मार्गांचा अवलंब केला होता.

अल्लाउद्दीनचा साम्राज्यविस्तार व महसूल सुधारणा –

सुलतान अल्लाउद्दीन खिलजीने मोठ्या प्रमाणात साम्राज्यविस्तार करण्याचे धोरण स्वीकारले होते. दिल्लीपासून हिंदुस्थानच्या दक्षिण टोकापर्यंत त्याने सत्ता प्रस्थापित केली होती. दक्षिणेतील देवगिरी, तेलंगणा, होयसळ, पांड्य अशी चार राज्ये त्याने आपल्या वर्चस्वाखाली आणली. या मोहिंमांमध्ये मलिक काफूर या सरदाराने मोठी कामगिरी केली. साम्राज्यविस्ताराबरोबर अल्लाउद्दीनने महसूलविषयक अनेक सुधारणा केल्या. जमिनीची मोजणी केली. पिकानुसार आकारणी करून उत्पन्नाच्या अर्धा हिस्सा शेतसारा आकारला. धान्य व रोख रकमेच्या स्वरूपात कर देता येत असे. करवसुली अधिकाऱ्यांवर कडक नियंत्रण ठेवून भ्रष्टाचार कमी केली अशी माहिती बरनीने दिली आहे.

२) बरनीने वर्णन केलेली सुलतानशाहीकालीन सामाजिक परिस्थिती –

बरनीने सुलतानशाही कालखंडात सामाजिक परिस्थितीचे वर्णन केलेले आहे.

अ) सामाजिक दारिद्र्य –

सुलतानचे धोरण अन्याय, अत्याचाराचे असल्यामुळे समाजात शांतता व सुव्यवस्था दिसून येत नव्हती. हिंदूविषयी जाचक धोरण व अनेक कर आकारल्यामुळे हिंदूची स्थिती दिवसेंदिवस कठीण होत गेली. जमीनदार व श्रीमंत हिंदूच्या मालमत्ता जप्त होऊ लागल्या. समाजात दारिद्र्य मोठ्या प्रमाणात वाढले. यामधून समाजाची स्थिती केविलवाणी झाली.

ब) शैक्षणिक सुविधा व अनुदानाचे प्रमाण कमी –

सुलतानशाहीत शैक्षणिक प्रगती मोठ्या प्रमाणावर झालेली नव्हती. सुलतानाला शैक्षणिक सुविधा, शिष्यवृत्ती यांचे महत्त्व समजले नव्हते. अशी स्थिती असली तरी अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात ४६ लोकांना सरकारी शैक्षणिक अनुदान मिळाले होते. यामधून त्यांनी विद्वता मिळविल्याची वर्णन केले आहे. तसेच त्यांनी बुखारा, समरकंद, बगदाद, कैरो, दमास्कस येथील विद्वानांपेक्षा अधिक प्रगती केल्याचे दिसते. मुहम्मद बिन तुघलकाने जात – धर्माचा विचार न करता सर्वांच्या विद्वत्तेचे कौतुक केल्याचे वर्णन आहे.

क) स्त्रियांची स्थिती –

हिंदू – मुस्लीम दोन्ही समाजांत स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान होते. पुरुषांपेक्षा स्त्रीचा दर्जा दुय्यम स्वरूपाचा होता. तिला कनिष्ठ समजले जात होते. 'चूल आणि मूल' अशीच स्थिती असल्याचे दिसते. तिला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत

होत्या. तिच्यावर अनेक बंधने लादली होती. मुलांना जन्म देणे, वाढविणे, पतीची सेवा करणे ही कामे तिच्याकडे होती. विवाहसंबधी अनेक जाचक रुढी, परंपरा होत्या. हुंडा पद्धती अस्तित्वात होती. मुलगी जन्मली तर कुटुंबाला नैराश्य प्राप्त होत होते. यामधून बालिकेचे बळी देणे असे प्रकार होत असावेत असे वाटते.

क्रांत्यांचे युग

1) प्रॉटेस्टंट धर्मसुधारणा क्रांती

1) जॉन विक्लिफ यांचे धर्मसुधारणेतील योगदान स्पष्ट करा.

→ धर्मसुधारणा चळवळीत जॉन विक्लिफ याला अग्रस्थान दिले जाते. तो ऑक्सफर्ड विद्यापीठात प्राध्यापक होता. त्याने 'बायबल' या ग्रंथाचा अभ्यास करून इंग्रजीत भाषांतर केले. बायबलमधील व सदर परिस्थितीतील धर्माबाबत त्याला फार मोठी तफावत दिसून येत होती. अनेक अनिष्ट प्रथा-परंपरा रूढ झाल्या होत्या. धर्मगुरुंनी स्वतःच्या स्वार्थाचाच विचार सुरु केलेला होता. त्यांनी धर्मसत्तेबद्दल आपली प्रकट मते मांडली. ती पुढीलप्रमाणे- 1) मानव स्वतः कोणत्याही मध्यस्थाशिवाय परमेश्वराकडे जाऊ शकतो. त्याला धर्मगुरु अगर इतरांच्या मध्यस्थीची आवश्यकता नाही.

2) जे धर्मगुरु पापमय कृत्ये करतात ते दुसऱ्याची दुःखे अगर पाप यांच्यापासून त्यांना मुक्ती देऊ शकत नाहीत. पापमुक्तीसाठी शुद्ध अंतःकरणानी भक्ती, नामस्मरण व प्रार्थना हे मार्ग अवलंबिले पाहिजेत. मोक्ष मिळविण्यासाठी धर्मयात्रा, धार्मिक कृत्ये करणे अगर मठात राहणे यांची गरज नाही. धर्मगुरु पापमुक्तीसाठी 'टाईथ' हा जो कर घेतात त्याचा बायबल ग्रंथात कोठेही उल्लेख नाही. त्यामुळे कोणत्याही धर्मगुरुने तो कर घेऊ नये

3) राजसत्ता ही सार्वभौम आहे. तिच्यावर पोपला वर्चस्व गाजविण्याचा अधिकार नाही.

4) बायबलचे अध्ययन सर्वांनी केले पाहिजे असा त्याचा आग्रह होता. जॉन विक्लिफने धर्मसुधारणा

चळवळ इंग्लंडमध्ये सुरु केली. त्यामुळे धर्मसत्ता चिडली. त्यांनी दबाव आणून ऑक्सफर्ड विद्यापीठातून त्यांना काढून टाकण्यास भाग पाडले.

बायबल या ग्रंथाचे इंग्रजीत भाषांतर करून त्याने ते लोकांना वाटले. राजसत्ता व धर्मसत्ता यांची निर्मिती परमेश्वराने केली आहे. या दोन्ही सत्तांचे मुख्य कर्तव्य लोककल्याण असेच आहे. या दोन्ही सत्तांचे मुख्य कर्तव्य लोककल्याण असेच आहे जर यांपैकी कोणी लोककल्याणापासून दूर गेला तर त्याला त्या अधिकारावर राहण्याचा अधिकार नाही. त्यांचे हे बुद्धिवादी विचार धर्मसुधारणा चळवळीचा पाया ठरले. त्यामुळेच त्याला या चळवळीचा 'शुक्रतारा' असे संबोधले जाते. त्याने भ्रष्ट, अनागोंदी कारभार असलेल्या आणि नैतिक अधःपतन झालेल्या धर्मसत्तेचे वाभाडे काढले. धर्मसत्तेतील ऐषआराम, चैन आणि विलास यावर जहरी टीका केली. काही लोकांमार्फत त्याने बायबलमधील विचार लोकांपुढे मांडले. त्यातून लोकजागृती झाली. युरोपात त्याचे विचार फैलावले. धर्मसत्तेचे त्याच्या विचाराला विरोध म्हणून त्याच्या मृत्यूनंतर त्यांचे प्रेत उकरून रस्त्यावर फेकून दिले. आपला विरोध त्यांनी या प्रकारे व्यक्त केला. असे असले तरी धर्मसुधारणा चळवळीला त्याच्या विचाराने चालना मिळाली.

2) धर्मसुधारणा चळवळीतील जॉन हस आणि इरॅस्मस यांचे कार्य सांगा.

→ धर्मसुधारणा चळवळीचा पाया जॉन विक्लिफ याने घातला. त्या चळवळीची वाटचाल पुढे सुरु झाली. त्यात जॉन हस व इरॅस्मस यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

जॉन हस – जॉन हस जर्मनीतील बोहेमियाचा रहिवाशी होता. तो प्राग विद्यापीठात प्राध्यापक असून जॉन विक्लिफचा अनुयायी होता. त्याने धर्मसुधारणा चळवळ बोहेमियात सुरु केली. धर्मसंस्थेतील अनागोंदी, भ्रष्टाचार, अनीती यावर कठोर टीका केली. बायबलमधील वचने खरी आहेत, हे त्याने लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न सुरु केला. त्याच्या या धर्मसुधारणा चळवळीचा राग येऊन सनातनी धर्माधिकाऱ्यांनी कॉन्स्टन्स येथे भरलेल्या परिषदेत त्याचा निषेध केला. तसेच त्याच्या सुधारणांना विरोध म्हणून त्याला पाखंडी म्हणून जिवंत जाळण्याची शिक्षा केली. 1415 मध्ये त्याला जिवंत जाळले. मात्र त्याने सुधारणावादी विचार सोडले नाहीत. उलट, पुढील काळात या विचारांचा फैलाव मोठ्या प्रमाणातच झाला.

इरॅस्मस – जॉन हस, डान्टे, वॅल्डो, रुशलीन यांसारख्या विचारवंतानी धर्मसुधारणा चळवळ तेवत ठेवण्याचे कार्य केले. त्यामुळे धर्मसंस्थेतील विकृत व्यवस्थेमुळे सामान्य माणसाच्या मनात धर्मसंस्थेविरुद्ध असंतोष वाढीस लागला. पुढे ही चळवळ इरॅस्मस या डच विचारवंताने अधिक सखोल माहितीसह बायबली लोकांपुढे मांडली. त्यामुळे धर्मसंस्थेतील खुळ्या समजुती व अंधश्रद्धा

अज्ञान याची सामान्य लोकांना जाणीव झाली. त्याचा जन्म हॉलंडमधील रॅटरडॅम येथे झाला. घरच्या अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमुळे त्याची प्रकृती अत्यंत दुबळी होती. मात्र वैचारिकदृष्ट्या तो अत्यंत प्रगल्भ होता. त्याने बायबलचा सखोल अभ्यास केला. जर्मनी, फ्रान्स, इटली, इंग्लंड आदी युरोपीय देशांना भेटी दिल्या. त्याने ख्रिश्चन धर्मातील दांभिकतेवर In Praise of Folly हा ग्रंथ लिहिला. त्याने उपहासात्मक पद्धतीचे लेखन केले आहे. तो लिहितो, "जगामध्ये मुर्खांचे राज्य आहे; त्यातल्या त्यात धर्म सत्तेमध्ये तर मूर्ख शिरोमणींचे राज्य आहे त्यांच्याविरुद्ध लोकांनी बंड पुकारू नये अशी इच्छा असेल तर, त्यांच्याबद्दल जनतेत असलेली पुरातन पूज्य बुद्धी तशीच चालू ठेवावयाची असेल तर, त्यांच्याबद्दल जनतेत असलेली पुरातन पूज्य तर त्यासाठी एकच मार्ग म्हणजे लोकांना अज्ञानात ठेवणे. कारण ज्ञानामुळे असंतुष्टता व सामाजिक अस्वस्थता निर्माण होते." त्याच्या अशा लिखाणामुळे धर्मसंस्थेचे खरे स्वरूप समाजासमोर आले. त्याने उपरोधी टीकेद्वारे धर्मगुरूंच्या दांभिकपणा त्यांची वर्तणूक, त्यांचे अवगुण यावर जहरी टीका केली. या टीकेमुळे धर्मगुरूबद्दल लोकांच्या मनात असलेल्या श्रद्धेला तडे गेले. त्याच्या लिखाणामुळे लोकांची मने धर्मसुधारणा चळवळीला अनुकूल सा

# मराठ्यांचा इतिहास

जाने. 1761 रोजी मराठ्यांनी अब्दालीवर हल्ला करुन लढाईस सुरुवात केली. लढाईत विश्वासरावाला गोळी लागून तो ठार झाला. हे समजताच सदाशिवभाऊ बेभान होऊन शत्रूवर तुटून पडला. युद्धाच्या घाई गर्दीत तो दिसेनासा झाला. आपला नेता दिसेनासा झाला त्यामुळे मराठी सैनिकांचा धीर खचला. त्याचवेळी अब्दालीच्या राखीव व ताज्या दमाच्या सैन्याने मराठ्यावर हल्ला चढवला. मराठ्यांचा पराभव झाला. महाराष्ट्रातील एक तरुण पिढी गारद झाली. अनेक पराक्रमी सरदार धारातीर्थ पडले.

पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची कारणे-

1) दिल्लीपतीचे रक्षण करणे — छत्रपती शाहूच्या सुटकेनंतर मराठ्यांचा उत्तरेच्या राजकारणाशी संबंध आला. प्रत्येक पेशव्यानी दिल्लीची मुघलसत्ता वाचविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. दिल्लीच्या बादशाहीच्या रक्षणाची जोखीम मराठ्यांनी घेतल्यामुळे अब्दालीस विरोध करण्यामुळे हे पानिपतचे युद्ध घडून आले.

2) उत्तरेकडील मराठ्यांचे राजकारण — उत्तरेकडील मराठ्यांच्या राजकारणामुळे हे पानिपतचे युद्ध घडून आले. मराठ्यांनी दक्षिणेकडून येऊन उत्तरेकडे राजकारणात हस्तक्षेप सुरु केला तेव्हा उत्तरेत एक लाट निर्माण झाली. या सर्वांनी उत्तरेच्या राजकारणातून मराठ्यांचे उच्चाटन करण्याचा निश्चय केला आणि त्यातून हे युद्ध घडूनआले

3) तहांची अंमलबजावणी — उत्तरेकडे मराठे गेल्यानंतर त्यांनी उत्तरेकडील अनेक सत्ताधीशांबरोबर तह, करार केले होते. त्यांच्या अंमलबजावणीसाठी त्यांना उत्तरेकडे जावे लागत होते. त्यातून हे युद्ध घडून आले.

4) परकीय आक्रमणांना तोंड देणे —

मोगल साम्राज्य औरंगजेबाच्या मृत्यूनंतर खिळखिळीत झाले होते. नादीरशहा, अब्दाली सारखे आक्रमक आक्रमणे करुन लूटालूट करायचे. मुघल साम्राज्य अंतर्गत राजकारण कपट कारस्थानाने जर्जर झाले होते. परकीय आक्रमणापुढे त्यांचा टिकाव लागत नव्हता. आपणच देशातील बलिष्ठ सत्ता असल्याने परकीय आक्रमणाला तोंड देणे आपले कर्तव्य आहे अशा विचारामुळे हे युद्ध घडून आले.

5) पंजाबच्या मालकीवरुन अब्दाली दुखावला —

भारतावर स्वाऱ्या करुन अब्दालीने अनेक प्रदेश आपल्या ताब्यात घेतले. पंजाबचा प्रदेश ही त्याने जिंकून घेतला मराठ्यांनी पंजाबवर हल्ला करुन तो प्रदेश त्यांच्याकडून परत घेतला. यामुळे अब्दाली दुखावला होता. मराठ्यांचा बदला घेण्याचे त्याने निश्चित केले होते.

6) मराठ्यांच्या चुका रोहिले, जाट रजपूत —

अयोध्येचा वजीर सफदरजंग आणि रोहिले पठाण यांच्यात प्रचंड शत्रुत्व होते. सफदरजंगा बरोबर झालेल्या करारामुळे रोहिल्यांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी मराठ्यांनी घेतली होती. त्यामुळे मराठा आणि रोहिले यांच्यात संघर्ष सुरु झाला. जयपूरच्या वारसा प्रकरणात मराठ्यांनी प्रेमापेक्षा जास्त लक्ष घातले त्यामुळे रजपूत मराठा संबंध बिघडले. मथुरेच्या सूरजमल जाट यांच्या प्रदेशावर मराठ्यांनी विनाकारण हल्ला केल्याने जाट नाराज झाले. अशा अनेक चुका मराठ्यांच्या कडून झाल्या होत्या.

मराठ्यांच्या पराभवाची कारणे -

1) मराठ्यांना समोरा समोरच्या युद्धाचा अनुभव नव्हता. पानिपतवर समोरा समोर युद्ध झाले. गनिमी काव्याचा वापर मराठ्यांनी केला नाही. त्यामुळे पराभव झाला.

2) मराठ्यांना उत्तरेस मित्र मिळवता आले नाहीत. विशेषत: जाट, रजपुत यांची त्यांना मदत झाली नाही. कारण मराठ्यांच्या वर्तनामुळे जाट व रजपूत दुखावले होते.

3) मराठ्यांना शिखांचे सहकार्य मिळविता आले नाही. खरे तर शिख व अब्दालीचे कट्टर शत्रुत्व होते याच्या फायदा करुन घेता आला नाही.

4) मराठ्यांकडे राखीव सैन्य नव्हते जे अब्दालीकडे होते. त्याचा उपयोग त्याने युद्धानंतर केला त्यामुळे त्याचा विजय झाला.

5) बाळाजी बाजीरावाने ही परिस्थिती हाताळण्यास स्वत: जाणे आवश्यक होते.

6) मराठ्यांच्या सैन्यात शिस्त नव्हती. सैन्याच्या हालचाली वेळ घालवणाऱ्या व उद्दिष्ट नसलेल्या होत्या उलट अब्दालीच्या सैन्याच्या हालचाली अचूक व शिस्तीने होत्या.

7) मराठा सरदारामध्ये एकी नव्हती. आपआपसातील वैरभाव व स्पर्धा वृत्तीमुळे मराठ्यांचे मोठे नुकसान झाले काही सरदार युद्ध क्षेत्रावरून पळून यामुळे पराभव झाला.

8) नजीबखान व मल्हारराव होळकर यांची मैत्री चुकीची होती. मराठ्यांच्या पराभवाकडे ही मैत्री घेऊन गेली.

9) बाजार बुणग्यांचा भरणा मराठ्यांच्यात खूप होता. सैन्याबरोबर बायका, मुले, वृद्ध माणसे मोठ्या संख्येने होते. अनेकांना उत्तरेकडच्या भाग बायका मुलांना दाखवायचा होता. काहींना देवदर्शनाचे पुण्य पदरी बांधायचे होते. पूर्वी लढाईवर जाताना सैनिक सडे जात होते. बाजार बुणगे, बायका, मुले सोबत नेणे चुकीचे ठरले.

10) मराठ्यांनी समोरासमोर सैन्य आल्यावर त्वकर हल्ला करणे गरजेचे होते. अडीच महिने विनाकारण घालवले. अन्न धान्य आणि सर्व गोष्टीवर ताण आला।

1761 च्या तिसऱ्या पानिपतच्या युद्धाचे परिणाम -

1761 चे पानिपतचे तिसरे युद्ध भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम करणारे ठरले. पानिपतच्या युद्धाबद्दल इतिहासकारांनी परस्पर विरोधी मते नोंदविले आहे. पानिपतच्या युद्धामुळे मराठ्यांच्या विस्तारवादी होरणास आळा बसला. पानिपतच्या युद्धामुळे मराठ्यांच्या सर्वांगीण विकास झाला पराभव झाला यातून मराठे कधीच सावरु शकले नाहीत. थोडक्यात परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील -

1) पानिपतच्या युद्धात एक तरुण पिढी, कर्त्या पुरुषांची एक संबध पिढी मारली गेली. मराठ्यांच्या आत्मविश्वास ला प्रचंड धक्का बसला.

2) पानिपतच्या युद्धामुळे मोगल सत्ता मोडून पडली, नामम बादशहा उरला. मोगल सत्तेचा अस्त झाला.

3) उत्तरेत शिख सत्तेच्या उदयास चालना मिळाली. मराठे मुघल आदींना बंग इ. संपल्यामुळे शिख सत्तेचा उदय झाला

4) पेशव्यांची मध्यवर्ती सत्तेला घरघर लागली. अनेक सरदार स्वतंत्रपणे वागू लागले.

5) इंग्रजांच्या उदयास चालना मिळाली. बंगाल मद्रास इ. ठिकाणी त्याने पाय घट्ट रोवण्यास सुरुवात केली.

6) पानिपतच्या युद्धातील मराठ्यांच्या पराभवामुळे मराठे अजिंक्य नाहीत ही गोष्ट दिसून आली. उत्तर हिंदुस्थानात आपल्या तलवारीच्या धाकावर मराठा सरदारांनी फार मोठा सत्ता विस्तार केला होता. मराठ्यांचा एक दरारा होता तो आता संपला.

## इतिहासाचे सिद्धांत

1) इतिहास - व्याख्या आणि व्याप्ती -

अ) इतिहास संकल्पना किंवा इतिहासाचा अर्थ -

मानवाला आपला भूतकाळ जाणून घेण्याची फार जिज्ञासा असते. मानवाने जी आजपर्यंत प्रगती केली आहे. ती कशी केली आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता असते. या भूतकाळाविषयीच्या जिज्ञासेतूनच इतिहासाचा जन्म झाला. पृथ्वीतलावर मानवाची प्रगती टप्प्याटप्प्याने झाली आहे. हा जो भूतकाळ आहे याबद्दल सर्वांनाच आकर्षण असते. मानव अगदी प्राथमिक अवस्थेत होता त्या वेळी त्याला भटकंती करावी लागत होती. त्याला प्रगतीसाठी जो संघर्ष करावा लागला त्याच्या खुणा त्याने मागे ठेवल्या तो नंतर स्थिरावला. त्यामुळे अनेक बाबी त्याला समजू लागल्या. मागे त्याने आपल्या अस्तित्वाच्या खुणा ठेवल्या. देवळे, इमारती, स्तंभ, चित्रे या रुपाने त्या पुढे उपलब्ध झाल्या. मानवाला आपल्या अस्तित्वासाठी आक्रमक व्हावे लागले. आपल्या अस्तित्वाची माहिती व्हावी म्हणूनच त्याने काव्य, महाकाव्ये निर्माण केली. त्यालाच इतिहासाची सुरुवात मानली जाते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला माहिती देणे हाच त्यांच्या लिखाणाचा मूळ उद्देश होता.

इतिहासात मानवी समाजाच्या भूतकाळात झालेल्या प्रगतीचा विचार केला जातो. इतिहासात मानवाच्या जीवनात भूतकाळात घडलेल्या गोष्टी, घडामोडी यांचा आढावा असतो. भूतकाळातील महत्त्वाच्या घटनांचाच विचार तेथे केला जातो. मात्र कालचक्राप्रमाणे यात बदल होत गेले. ग्रीकांनी शास्त्रशुद्ध इतिहास लिहिण्याच्या पद्धतीचा वापर केला. या भाषेतील Istoria या शब्दापासून इतिहासाची उत्पत्ती मानतात. या

शब्दाचा अर्थ शिकणे किंवा माहिती गोळा करणे किंवा चौकशी करणे असा आहे. याच अर्थाचा शब्द जर्मन भाषेत Geschichte असा आहे. अरबी भाषेत तारीख इंग्रजीत History व संस्कृतमध्ये इतिहास असे शब्द आहेत. इतिहासाचे हे अर्थ स्थूल स्वरूपाचे आहेत. इतिहासात मानवाच्या जीवनातील वैशिष्ट्यपूर्ण घटनांचा विचार केला जातो. मात्र तो अर्थ मर्यादित होता. भूतकाळात एखादी घटना सुरु होते आणि ती वर्तमान-काळातही सुरु असते अशा घटनांचा अभ्यास केला जातो सुसंगतवार माहिती घेण्यासाठी हे आवश्यक आहे.

भूतकाळातील घटनांचा मागोवा घेताना अचूक बोध झाला पाहिजे अशी अपेक्षा असते. त्यासाठी शास्त्रीय बैठक असावी लागते. मानवी जीवनावर अनेक बाबींचे परिणाम होत असतात. मानवी जीवनावर निसर्ग, अर्थकारण, समाज अशा बाबींचा प्रभाव पडतो त्यामुळे इतिहासाचे आज वेगवेगळे प्रकार पडलेले आहेत. मानवाच्या प्रगतीची अचूक माहिती मिळावी म्हणून संदर्भसाधनांचा आधार घ्यावा लागतो. त्यांच्यात कार्यकारणभाव शोधावा लागतो. या सर्व प्रक्रिया इतिहासात येत असतात.

मानवाच्या ठिकाणी जिज्ञासा असते. त्याला आपला भूतकाळ जाणून घेण्याची इच्छा असते. आज मानवाने अनेक क्षेत्रांत प्रगती करून भविष्याचा वेध घेण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. हे करण्यासाठी त्याला आपल्या भूतकाळात डोकावून पहावेच लागते. आजपर्यंत मानव मानवी जीवनात केलेली प्रगती कोणत्या अवस्थेतून केली याची जाणीव करून घेतल्याशिवाय त्याला भविष्याकडे पाहता येत नाही. या जिज्ञासेतूनच इतिहासाचा जन्म झाला. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवणे गरजेचे आहे

ती म्हणजे मानवी जीवनातील सर्वच नोंदी विचारात घेतल्या जात नाहीत. ठळक घटनांचाच विचार केला जातो. काळाच्या ओघात त्यात बदल होत गेले. पूर्वीच्या काळी इतिहासात राजकीय घडामोडींनाच प्राधान्य होते. राजे-रजवाडे, त्यांनी केलेल्या लढाया, तह, धर्म, पाप-पुण्य यांच बाबींचा विचार केला जात होता. मात्र आज इतिहासात व्यापक दृष्टिकोण स्वीकारला आहे. मानव, समाज, संस्कृती, वेगवेगळ्या कला, श्रद्धा, तंत्रज्ञान, अर्थकारण, परंपरा अशा नानाविध बाबींचा विचार केला. इतिहासाला आज व्यापकता आली. इतिहासात भूतकाळातील घटना सुसंगतवार मांडण्याचा प्रयत्न केला जातो. इतिहास या संज्ञेमध्ये चौकशी करणे आणि वस्तुस्थितीसंबंधी काय विधाने आहेत याची माहिती करून घेणे असा अर्थ आहे. यातूनच इतिहासाच्या वेगवेगळ्या व्याख्या तत्त्ववेत्त्यांनी मांडल्या आहेत. मात्र यातील कोणतीच व्याख्या परिपूर्ण नाही. इतिहासात आज मानवी संस्कृतीच्या सर्व महत्त्वाच्या अंगांचा विचार केला जात आहे. यामुळे इतिहासाला फार व्यापकता प्राप्त झाली आहे.

ब) इतिहासाचे महत्त्व -
इतिहास हा वर्तमानकाळातून भूतकाळात आणि त्यातून भविष्याचे वेध घेत असतो. इतिहासातील अनुभवांच्या साठ्यांवर समाज पुढे जात असतो. इतिहासामुळे समाजाला वेळ आणि काळ यांचे महत्त्व समजते. इतिहासाच्या अध्ययनामुळे मानवाची दृष्टी विशाल होते. त्याची बुद्धिमत्ता वाढते. त्याच्यात सहिष्णुता येते. देशाच्या इतिहासाने लोकांचा स्वाभिमान, आत्मसन्मान, राष्ट्रप्रेम निर्माण होते. इतिहासाचे महत्त्व पुढील मुद्द्यांच्या सोहाय्याने मांडता येईल.

१) भूतकाळाचा शोध घेण्याची जिज्ञासा -
इतिहासात भूतकाळातील सत्य घटना व त्यांच्यातील अन्वयार्थ लावून भूतकाळ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. मानवाच्या हातून जिज्ञासूपणामुळेच इतिहासाचे लेखन झाले आहे. इतिहासात भ्रामक कल्पनांचा विचार केला जात नाही. सत्य गोष्टींचेच स्पष्टीकरण केले जात असल्यामुळे ज्ञानात भर पडते. गतकाळातील माणसांचे पराक्रम, शोध, त्यांच्या चुका, अपयश, यश आदी बाबींचा सखोल अभ्यास केल्यामुळेच मानव शहाणा होतो. इतिहास माणसाला शहाणपण शिकवीत असतो. त्यामुळे फ्रान्सिस बेकन यांनी इतिहासाची व्याख्या, " मानवाला शहाणे बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास " अशी केली आहे.

२) वर्तमानाचे ज्ञान -
काळ ही सापेक्ष कल्पना आहे. इतिहासात भूतकाळच पाहिला जातो. आज जो वर्तमानकाळ आहे तो उद्या भूतकाळ होत असतो. भूतकाळाचा वर्तमानकाळातील घडामोडींशी संबंध असतो. तो जाणून घेतल्यास वर्तमानकाळाचे योग्य ज्ञान होते. वर्तमानकाळातील प्रश्न

सोडवण्यासाठी भूतकाळ माहित असणे गरजेचे आहे. मार्विन हा इतिहासकार म्हणतो, "इतिहास नसलेले लोक किंवा इतिहासाची जाणीव नसलेला समाज हा भ्रमिष्ट झालेल्या माणसासारखा आहे. इतिहास माहित असलेल्या समाजाने आपल्या चुका टाळून चांगली प्रगती केली आ

3) भविष्यकाळासाठी मार्गदर्शक –

इतिहास भूतकाळातील सत्य घटनांचा शोध घेतो. वर्तमानकाळातील चुका दुरुस्त करून भविष्य घडविण्याचा प्रयत्न करतो. भूतकाळातील घटनांचा सांगोपांग विचार केला जातो. तो फक्त मार्गदर्शन करतो. भविष्यात काय घडेल याची क्षमता त्याच्याकडे नाही. नेव्हीस म्हणतो, "इतिहास म्हणजे भूतकाळाला वर्तमानकाळाशी जोडणारा पूल आहे.व तो भविष्याचा मार्गदर्शक आहे इतिहास समाज आणि राष्ट्र यांच्यातील बदलांचा विचार करतो त्यामुळे समजाला नवीन दृष्टिकोण तयार होतो.

4) बुद्धिवादाला चालना –

विचार करण्याची पात्रता फक्त मानवालाच आहे. इतिहासाच्या अभ्यासाने मानवाच्या तर्कशक्तीत भर पडत असते. त्यामुळे बुद्धिवादाला चालना मिळते.

इतिहास जागतिक शांततेसाठी उपयोगी ठरतो. आंतरराष्ट्रीय समस्या सोडविण्यासाठी चर्चेचा मार्ग दाखविते मानवाला एका व्यासपीठावर येण्याची संधी देतो. आत्यंतिक राष्ट्रवादाचे तोटे, मानवतावाद, बंधुभाव यांचे गुण स्पष्ट झाल्यामुळे जग आज जवळ येत आहे.